# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१
# डी.टी.एड्. व डी.एल.एड्. परीक्षा नोव्हेंबर २०१८

## उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळण्याबाबतच्या महत्वाच्या अटी /शर्ती व सूचना

१) विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी परीक्षा परिषदेकडे करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहीत पध्दतीने अध्यापक विद्यालयामार्फत अर्ज करणे आवश्यक आहे.

२) ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसापर्यंत संबंधित अध्यापक विद्यालयामार्फत परिषदेकडे विहीत नमून्यात अर्ज करावेत तद्नंतरच्या दिनांकांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

३) **दिनांक २५/०२/२०१९ (कार्यालयीन वेळेपर्यंतच) समक्ष अथवा पोस्टाने प्राप्त होणारे उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणी करणेसाठीचे अर्जच ग्राहय होतील. २५/०२/२०१९ नंतर प्राप्त होणारे अर्ज (२५/०२/२०१९ पूर्वीचे शुल्क अदा केलेले बँकेचे चलन, डी.डी. , धनादेश असले तरीही) ग्राहय होणार नाहीत.**

४) विहीत अर्जातील माहिती पूर्णपणे भरलेली असावी. अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी **प्रतिविषय रु.४००/-** इतके शुल्क आकारण्यात येईल.

६) उत्तरपत्रिका छायाप्रती मागणी बाबतचा अर्ज व शुल्क (रोख किंवा परिषदेच्या चलनाव्दारे अथवा राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाव्दारे) थेट परिषदेकडे अथवा पोस्टाने स्विकारण्यात येईल. अर्जासोबत विद्यार्थ्याच्या संकेतस्थळावरील गुणांची गुणपत्रिकेची छायाप्रत जोडावी.

७) उत्तरपत्रिका छायाप्रत मिळविण्यासाठी अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

८) मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे शीघ्र डाकेने किंवा हस्तपोच देण्यात येईल. अर्जावर भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

९) समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र / फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अथवा कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

१०) एकदा उत्तरपत्रिकेची छायाप्रत दिल्यावर त्याच्याशी संबधित कोणतीही माहिती, माहिती अधिकार अधिनियम अंर्तगत दिली जाणार नाही.

११) परीक्षक /समीक्षक इ. ची माहिती, माहिती अधिकाराखाली देण्यात येणार नाही.

१२) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यास माहिती अधिकाराखाली त्याच्या कोणत्याही उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१३) उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१४) विहीत मुदतीत उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत मागणी करण्याचा विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त न झाल्यास कोणत्याही परिस्थितीत आपण अदा केलेले शुल्क परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

**टिप :- संबधीत सूचना प्रसिध्दीसाठी अध्यापक विद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या नजरेस येईल अशा दर्शनी नोटीस बोर्डवर लाववी.**

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळणेबाबत अर्जाचा नमुना

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| प्रकरणिका क्र. | |

डी. टी. एड्. व डी.एल.एड्. परीक्षा नोव्हेंबर २०१८

प्रति,

अर्ज करण्याचा अंतिम दि. २५/०२/२०१९

मा. आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१

महोदय,

मी खाली सही करणार विनंती अर्ज करते की /करतो की, नोव्हेंबर २०१८ अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा (D.T.Ed) /प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम (D.El.Ed.) परीक्षेसाठी नमूद केलेल्या बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झालो होतो /झाले होते. सदर परीक्षेच्या खालील विषयांच्या उत्तरपत्रिका /उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती मला मिळावी /मिळाव्यात यासाठी मी रु. ४००/- (रुपये चारशे मात्र) प्रति विषयशुल्क भरत आहे. माझा आवश्यक तपशिल खालीलप्रमाणे.

| परीक्षा बैठक क्रमांक | परिक्षार्थीचे पूर्ण नाव | अ. वि. सांकेतांक क्रमांक | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

| | | |
|---|---|---|
| पिनकोडसह पूर्ण पत्ता :- | | |
| | | |
| तालुका :- | जिल्हा :- | पिनकोड नंबर |
| दुरध्वनी क्रमांक/ मोबाईल क्र. | | |

उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळणेबाबतचा तपशिल :

(संकेतस्थळावरील गुणपत्रिकेची / प्रवेशपत्राची प्रमाणित छायाप्रत (झेरॉक्स) सोबत जोडावी. )

| अ.क्र. | विषय कोड क्रमांक | विषयाचे नाव | उत्तराचे माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| उ.प. छायांकित प्रत देणेसाठी अर्ज केलेल्या विषयांची एकूण संख्या | भरलेले शुल्क | शुल्काचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | डी. डी. क्रमांक | पावती क्रमांक | चलन क्रमांक | दिनांक |
| | | | | | |

सदर उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत मिळण्यासाठी प्रती विषय शुल्क ४००/- रुपये प्रमाणे **"आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे"** यांचे नावानेच चलनाद्वारे पाठवावे. किंवा **"बँक ऑफ इंडिया" पुणे शाखा खाते क्र. 050010210000031 (IFSC- BKID 0000500)** या खात्यावर रक्कम भरावी व पावती/ चलनाची प्रत अर्जासोबत जोडावी.

वरील दिलेली माहिती खरी असून या अर्जाच्या सोबत दिलेल्या अटी / शर्ती व सूचना त्या मला मान्य आहेत. वरील विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती हस्तपोच / पोस्टाव्दारे देण्यात याव्यात. वर दिलेली माहिती सत्य आहे.

दिनांक : ठिकाण : विद्यार्थ्याची स्वाक्षरी

टिप - उत्तरपत्रिका छायाप्रतिची मागणी करण्याच्या अर्जाची अंतिम दि.२५/०२/२०१९ अशी आहे. या मुदतीनंतर हस्तपोच किंवा पोस्टाद्वारे प्राप्त झालेले अर्ज (दि.२५/०२/२०१९ पूर्वीच शुल्क अदा केलेले बँकेचे चलन, डी.डी. , धनादेश असले तरीही) ग्राहय समजण्यात येणार नाहीत. ज्या विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणी केली आहे, त्याच विषयाच्या उत्तरपत्रिका गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

प्रमाणित करण्यात येते की, वरील तपशील तपासून पाहिला असून तो बिनचूक असल्याची खात्री केली आहे.

प्राचार्य,

स्वाक्षरी व अध्या. विद्या. शिक्का